गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक २९१ * नांदेड * रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

एक होता सुभाष...

कथा

मुंबईचा अरबी खवळला होता. त्याच्या लाटा एकावर एक आदयत, ऊखयत फेस काळत होता. लाटा एकमेकीशी कुस्तमकुस्त्या खेयत होत्या. काठावर येवून रेतीत ईरघयत होत्या. गरम झालेली काठावरची रेती थन्ड अन् वली होत होती. चटईवाला चटया काखित दाबून फेरफटका मारत ईकळे तिकळे फिरत हिंडत होता. रेतीवर बसलेल्या लोकायले 'चटई मिलेगा दस रूपये घंटा, चटई ले लो दस रूपया घंटा... अस म्हनत होता. चहावाला कॅटली घेऊन गिरगावच्या चौपाटीवरच्यां ऽऽऽ च्यां ऽऽत्र्ऽ दो रूपया कटिंग अस् बारीक अवाजात म्हनत कप कपावर आदयत वाजवत होता.

बंबई की चौपाटी की थंन्डी थंन्डी कुल्फी लो जो गलेको थंन्डक पहुचाती है. असं महन्त लोखंडी डब्बा घेवूनं पीतयीची हातघंटी वाजवत फिरत होता. लाल, गुलाबी, पिव्वी, पांढी, केसरी अन् तांबूस कांडी लहान लेकरायले आकर्षीत करत होती. गॅसचे फुगे ईकनारी बाई हटकून लेकराय जौळ येवूनं रंगबेरंगी फुगे दाखवत होती. धागा खाली ओहळून अखीन हात सैल करे. त कानातला मय काहाळनारा बाप्या ऊल्शी पेटी खांद्याले टांगून अरधाक फुट लंबी तार अन् काहीतरी ऊल्श्या बाटलीत लिक्विड घेवून फिरत म्हनत होता. कान का मैल

निकालकर मिलेगा भैय्या. तीन रूपया का दो कान, तीन रूपया का दो कानं.अस म्हनत फिरत होता.

सुभाष समिंदरच्या काठावर बसून दूरचं क्षितिज पाह्यत होता. भरती ओहटीनं जीते असलेले शंख शिंपले काठावर येत होते. सुभाष रेतीत पाय रूतवून बसला होता. लहान पोरं कल्लाहल्ला करत समुद्राच्या लाटासोबत खेयत होते. तेयच्या चड्ड्या भिजत होत्या. थकले की थे रेतीचे घर बांधत होते. घर बांधताना रेती ऊकरल्यावर खाली पानी लागत होतं. विहिरीले पानी लागल्यागत थे हरकिजान पाह्यत होते. एक नव जोडप बिलगून बसल होतं. थे तेयच्याच तंद्रीत रममान होतं. सुभाष थे सारं शुन्य नजरेनं पाह्यत होता. समुद्र जसा सुभाष सोबत बोलत होता.

अल्लादी दिवस कलाले लागला होता. सूर्य समुद्रात बुळून राह्यला की काय लोकायले वाटत होतं. केशरी रंगाची चादर पसरवत सूर्य अस्ताले गेला. समुद्र केसरी झाला होता. रसत्यावर वाहनाची वर्दळ वाहाळली होती.सुभाष एका विचारात गुतला होता. मुंबईत येवून आपन एकट झालो. गावात किती ओयखी पायखी घरामधून बाहेर निघालो की राम राम करत हात वरच राह्याचा. लंगोटी यार भेटाचे. तेयच्या सोबत फाट्यावरल्या टपरीवर चा पेनं, बिळी फुकनं, दंगामस्ती करनं. मायच्या हातची गरमागरम चुलीवरची भाकर मटन मासोया खानं. बापाच्या रूबाबाखाली जगनं. भूलीचं थे मनमोहक हासनं. हिवायात हुळ्ळा, ऊंब्या, हुया, बोरं, ऊस खानं. आंगनात बाजीवर वाकय टाकूनं झाळावरच्या पाखरायची किलकिल आयकत निचंत झोपन. रेडीओ वरच्या बातम्या, किर्केट समालोचन आयकनं. सुभाष जुन्या गोष्टी आठवत होता. सुभाष अखिनच भूतकाळात शिरला. पंधराक वरषाचा असन तव्हा सुभाष. एका रोजी सुभाषची माय वावरात गेली. तिन सुभाषसाठी दोन भाकरी दवळीत ठेवल्या अन् गंजूलीत हलक्या मटनाची तर्रीबाज भाजी ठुवून थे वावरात निंदाले गेली होती. गावातली कबरी कुतरी दाराच्या फटीतून आंग चोरून घरात शिरली अन् गंजूली ऊबळून तीनं मटन खाल्ल, दवळीतल्या दोही भाकरी सुंवा केल्या अन् कापसाच्या गंजीवर जावूनं निचंत निझली. सुभाष शाळेतून घरी आला. गंज पाह्यते त काय रिकामा. दवळीत चांदकही नाही अन् ऊंड्याची लक्ष्मीही नाही. सुभाष ऊपाशीच पोट्यायसंग सुरपारंबी खेयाले गेला. दिवसभर खेवून थकून गेला. मंग दोयपारी पंचफुला भोयीनच्या घरी गेला. भट्टीच्या वर ठुयलेल्या रेवाच्या कळईतून पोंगें टरटर फुगून वर येत होते अन् पंचफुलाबाई फोळलेले पोंगे काहाळून पोत्यावर टाकत होती. तीन हेरलं सुभाषले भूक लागली म्हनूनसन्या. कारे पोंगे खात काय?

पंचफुलाबाई म्हनली.

सुभाषन होकारात्मक मान डोलवली.

घेनं मंग तासकीत तुले लागनं तेवळे खाय. पन् खानं झाल्यावर तुराट्या भट्टीत लोटू लाग.

पंचफुलाबाई बोल्ली.

हव आजी. अस म्हनून सुभाष सन्नावूनं भिळ्ळा. पोट भरूनं कचरकचर पोंगे खाल्ले अन् बोंदरी लावलेल्या घळ्ळीतलं पोटभर पानी पेला अन् तुराट्या भट्टीत सरकवू लागला. दिवस कल्ला. सयसंध्याकाय झाली. सुभाषची माय जिजाबाई घरी आली. दवळी गंज हुसकून पाह्यला. सारं सफाचक. सुभाष घरी आला.

कारे बाबू भाकर अन् मटन खाल्ल काय?

नाही व माय. दवळीत त कुटका नोता. अन् गंजूली त रिकामीच होती.

अव्व माय! कुतरं गीतर घुसल असनं घरात. चल तुले पटकन एक भाकर टाकूनं देतो अन् मंग तू जेवं.

अस् जीजा बोलूनं घोय खोसूनं भाकर कराले हातपाय न धुता बसली. तीनं कोपर घेतला. चायनीनं पिठ गायलं. पिठात चिमूटभर मिठ टाकलं. घळाळीतलं पानी तांब्यात घेतलं. तावा चुलीवर ठुयला. चूलीच्या तोंडात तु-हाट्या खोसल्या. चिळी पेटोली. सौद्याचा कागद चुलीत टाकला. अंगारडब्बीन चूल भळकोली. ऊंडा चुरला. हातावर भाकर थापली. ताव्यावर पान्याचा शिपका मारला अन् रप्पकन भाकर ताव्यावर टाकली. भाकर दोही बाजूनं भाजली.आर बाहेर ओहळला. भाकर आरावर ऊभी केली. अन् भाकरीचा कुटका दवळीत टाकूनं भाकर तासकीत देल्ली.

घे मा खाय भाकरं.

अस जिजाबाई बोलली.

सुभाषनं तासकी घेतली. तासकीत भाकर घेतली. भाकरीवर लाल चटनी घेतली. चटनीच आय केल. आयात पानी वतलं. अन् सुभाष म्हनते कसा.

मा हे भाकर म्हनजे तू अन् हे चटनी म्हनजे तुया माथ्यावरलं कुकू.

बापा बापा एखांद्या लेखका सारखाच बोल्त तू. मा मले लय मोठा लेखक बनाच हाय. मंग शिका लागनं तुले. पुस्तक वाचा लागनं. हव मा मी लेखकच बननं. अस् सार सुभाषले समुद्राच्या काठावर बसून आठोत होतं. आज सुभाष ऊपाशी होता. पन् पटकन भाकर करून द्याले माय नोती.

–सु. पुं. अढाऊकर
अकोला
मो. ९७६९२०२५९७

'फळांची कोडी'–बालबुद्धीला चालना देणारा रसाळ काव्यसंग्रह



पुस्तक परिचय
पंडित पवळे
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

फळांचा गोडवा जिभेला आनंद देतो, तर त्या फळांची ओळख करून घेण्यातील कुतूहल बालमनाला ज्ञानाचा आनंद देते. निसर्गाने मुक्तहस्ताने बहाल केलेल्या फळांच्या रंग, रूप, चव, गुणधर्म आणि उपयोगांची ओळख जर कवितेच्या माध्यमातून झाली, तर शिक्षणाची प्रक्रियाही आनंददायी बनते. बालमनाची हीच नस अचूक ओळखून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून साहित्यनिर्मिती करणारे विदर्भातील खामगावचे प्रा. देवबा शिवाजी पाटील यांनी 'फळांची कोडी' या बालकाव्यसंग्रहातून चिमुकल्या वाचकांसाठी ज्ञानाचा चवदार आणि रसदार मेवा उपलब्ध करून दिला आहे.

मराठी आणि इंग्रजी भाषांतील एकशे चार पुस्तके प्रकाशित करण्याचा समृद्ध साहित्यिक अनुभव असलेल्या प्रा. देवबा पाटील यांची लेखणी विविध साहित्यप्रकारांतून वाचकांशी संवाद साधते. विज्ञानाचा अभ्यास आणि साहित्याची जाण यांचा सुरेख संगम त्यांच्या या बालकाव्यसंग्रहात अनुभवायला मिळतो. अवघ्या कवितांच्या माध्यमातून फळांची ओळख करून देताना त्यांनी मुलांच्या जिज्ञासेला, कल्पनाशक्तीला आणि आकलनशक्तीला केंद्रस्थानी ठेवले आहे. म्हणूनच 'फळांची कोडी' हा केवळ कोड्यांचा संग्रह न राहता निसर्गाशी मैत्री घडविणारा ज्ञानरंजक उपक्रम ठरतो. आंबा, नारळ, सुपारी, संत्रे, मोसंबी, केळी, पपई, चिकू, डाळिंब, पेरू, नासपती, किवी, सीताफळ, रामफळ, अननस, द्राक्षे, लिंबू, बोर, चिंच, जांभूळ आणि आवळा अशा अनेक परिचित व काही अपरिचित फळांची ओळख या संग्रहातून करून दिली आहे. फळांचे रंग, आकार, चव, ऋतू, वैशिष्ट्ये आणि उपयोग यांची माहिती साध्या, सुबोध व ओघवत्या शब्दांत गुंफली आहे. रोज पाहिलेल्या फळाकडेही नव्या नजरेने पाहावे, त्याचे गुणधर्म जाणून घ्यावेत आणि स्वतः विचार करून उत्तर शोधावे, अशी प्रेरणा या कविता देतात.

कोड्यांतून उलगडणारा फळांचा राजा! 'मला ओळखा' या स्वरूपातील कविता कवीच्या लेखनशैलीचे उत्तम उदाहरण आहे. आंब्याच्या विविध अवस्थांचे वर्णन करताना कवी त्याच्या हिरव्या रंगापासून केसरी–पिवळ्या रूपापर्यंतचा प्रवास सहजपणे उलगडतो. कच्च्या आंब्याचा लोणच्यासाठी होणारा उपयोग, पिकलेल्या आंब्याची गोडी आणि त्याच्या रसाची चव सांगत अखेरीस वाचकाला प्रश्न विचारतो

फळांचा राजा।
मला म्हणती।
उन्हाळ्याचा।
मी सोबती।।
असा आहे मी।
तुमचा आवडता।
तुम्हीच मला।
ओळखा आता!।।

या ओळींमध्ये आंब्याचे वर्णन तर आहेच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे बालवाचकाला उत्तर शोधण्याच्या आनंदात सहभागी करून घेण्याची कवीची हातोटी आहे. कविता वाचताना मुलांच्या मनात आंब्याचे चित्र उभे राहते आणि उत्तर ओळखल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलते. हीच बालकवितेची खरी ताकद! अशी प्रत्येक कविता निरीक्षण, तर्क आणि ज्ञान यांची त्रिवेणी संगम साधते.

'कोण त्यास ओळखते?' ही दुसरी कविता पाहिली, तरी कवीची कल्पकता लक्षात येते. फळाचा आकार, कच्च्या अवस्थेतील चव, पिकल्यावर होणारा रंगबदल आणि त्यातील पोषणमूल्यांचा उल्लेख करीत कवी मुलांना उत्तर शोधण्यास प्रवृत्त करतो. अशा कवितांमधून मुलांना केवळ फळांची नावे पाठ होत नाहीत, तर त्यांचे निरीक्षण करणे, वैशिष्ट्यांमधील साम्य–भेद ओळखणे, संकेतांचा विचार करणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे यांचाही सराव होतो. प्रश्न विचारण्याची सवय, बारकाईने निरीक्षण करण्याची दृष्टी आणि स्वतः विचार करून उत्तर शोधण्याची क्षमता हे या संग्रहाचे खरे शैक्षणिक फलित आहे.

कोड्यांच्या माध्यमातून विज्ञाननिष्ठ विचारांची बीजे बालमनात पेरण्याचे काम प्रा. देवबा पाटील यांनी प्रभावीपणे केले आहे. आरोग्याचा संदेश देत आणि निसर्गाशी मैत्री जोडली आहे. फळे ही निसर्गाची आरोग्यदायी देणगी आहे. संतुलित आहारात विविध फळांचा समावेश केल्याने शरीराला आवश्यक जीवन–सत्त्वे, खनिजे आणि तंतुमय पदार्थ मिळण्यास मदत होते. मात्र, प्रत्येक फळाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. त्यामुळे फळांच्या विविधतेची ओळख करून देणारा हा संग्रह मुलांना आहाराविषयी जागरूक करण्यासाठीही उपयुक्त ठरतो.

'फळ खा, नाही तर फळ भोगा' या परिचित म्हणीचा आशय येथे समर्पकपणे आठवतो. फळांचे महत्त्व जाणून घेणे, निसर्गाने दिलेल्या देणगीचा आदर करणे आणि आरोग्यदायी आहाराची सवय लावणे, या गोष्टी बालवयात रुजणे आवश्यक आहे. या दृष्टीने 'फळाची कोडी' मनोरंजनाबरोबरच आरोग्यविषयक जाणीव आणि निसर्गप्रेम वाढविण्यास हातभार लावते.

या पुस्तकातील भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिची सहजता. मुलांना समजणार नाहीत अशा अवघड शब्दांचा किंवा बोजड उपदेशाचा आधार न घेता कवीने थेट बालमनाशी संवाद साधला आहे. कोड्यांमुळे निर्माण होणारी उत्सुकता मुलांना पुढील कविता वाचण्यास प्रवृत्त करते. घरात, शाळेत किंवा मित्रमैत्रिणींच्या सहवास–ात ही कोडी एकमेकांना विचारता येतात. त्यामुळे वाचनाची गोडी, संवादकौशल्य आणि सामूहिक आनंद यांनाही चालना मिळते.

पुणे येथील यशश्री पब्लिकेशनच्या प्रकाशिका धनश्री गायकवाड यांनी या कविता पुस्तकरूपाने वाचकांसमोर आणल्या आहेत. अर्चना कुलकर्णी यांनी साकारलेले आशयपूर्ण मुखपृष्ठ पुस्तकाच्या विषयाला साजेसे आहे. पुस्तकाचे बाह्यरूप आणि त्यातील ज्ञानरंजक आशय यांचा मेळ बालवाचकांना आकर्षित करणारा ठरतो.

बालमनासाठी चवदार बौद्धिक खुराक! एकंदरीत, 'फळाची कोडी' हा फळांच्या परिचयातून ज्ञान, आरोग्यजाणीव, निसर्गप्रेम आणि विचारशक्ती यांचा विकास साधण्याचा प्रयत्न करणारा आनंददायी बालकाव्यसंग्रह आहे. मुलांना शिकविण्यापेक्षा शिकण्याची गोडी लावणे अधिक महत्त्वाचे असते. प्रा. देवबा शिवाजी पाटील यांनी कोड्यांच्या माध्यमातून हीच शिकण्याची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

विद्यार्थ्यांनी हा संग्रह आवडीने वाचावा, पालकांनी मुलांना कोडी सोडविण्यास प्रोत्साहन द्यावे आणि शिक्षकांनी पूरक वाचन, भाषिक उपक्रम तसेच पर्यावरण व आरोग्यविषयक चर्चांसाठी त्याचा उपयोग करावा. फळांचा आस्वाद घेताना त्यांच्या गुणधर्मांविषयी जाणून घेण्याची आणि प्रत्येक गोष्टीमागील कारण शोधण्याची सवय मुलांना लागली, तर या पुस्तकाचा हेतू निश्चितच सफल होईल. फळांचा गोडवा चाखता चाखता बुद्धीला विचारांची धार देणारा हा संग्रह बालवाचकांसाठी निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण फळांची चव जिभेवर रेंगाळते; पण ज्ञानाची गोडी मनात आणि बुद्धीत कायमची रुजते!

पुस्तक परिचय
पुस्तकाचे नाव : फळाची कोडी
लेखक : प्रा. देवबा शिवाजी पाटील
पृष्ठसंख्या : ६०
किंमत : रु.१००

दिवाळी

दिवाळीचा गोडवा आता
पूर्वीसारखा राहिला नाही
महागाईने कंबरडे मोडले
बटव्यात काही उरत नाही
कसे करावे आता गोड धोड
शेतात काही पिकलेच नाही
कपडे लत्ते तर सोडाच
आग पेटीलाही रुपया नाही
वर्षभर शेतात राबराब राबूनही
हातात काडी शिवाय काही नाही
असाकसा दुष्काळ देवा
तुझा खेळ काही कळत नाही
डोक्यावरच कर्ज काही
फिटता फिटत नाही
मायबाप सरकारच्या
पाच हजारात किराणा येत नाही
अशी कशी थट्टा देवा
दुष्काळ पाठ सोडत नाही
पिकलच कधी देवा मुठभर
त्याला भावच मिळत नाही
कशी करावी दिवाळी
इथे शेतकऱ्याला वालीच नाही
खोट्या आश्वासनाशिवाय
पदरात आमच्या काहीच नाही

–रा. हा. जेठेवाड बरबडेकर
रा. नायगांव बाजार, जि. नांदेड
मो. ९४२०८१४०९९

अक्षरगोदा : अक्षरांतून विचारांचा प्रवाह

या अंकापासून रविवारच्या 'गोदातीर समाचार'मध्ये ज्येष्ठ पत्रकार/साहित्यिक आणि निवृत्त प्राध्यापक सु. मा. कुळकर्णी यांचे 'अक्षरगोदा' हे नवे सदर वाचकांच्या भेटीस येत आहे. 'अक्षरांतून विचारांचा प्रवाह, साहित्याचा आस्वाद, विचारांची चिकित्सा आणि समाजभानाचा जागर करण्याचा त्यांचा मनोदय आहे. आम्हांला खात्री आहे हे नवे सदर आमच्या वाचकांच्या पसंतीस उतरेल. –संपादक

अक्षरांशी माझे नाते केवळ लेखन–वाचनापुरते मर्यादित नाही. अक्षरांच्या माध्यमातून माणसाला समजून घेणे, समाजातील घडामोडींचा अर्थ लावणे, साहित्याच्या अंतरंगात डोकावणे आणि रूढ समजुतींची विवेकाच्या कसोटीवर चिकित्सा करणे, हा माझ्या वैचारिक प्रवासाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. पत्रकारिता, साहित्य आणि अध्यापन या क्षेत्रांशी जोडले गेल्यामुळे शब्दांचे सामर्थ्य आणि समाजाप्रती असलेले लेखनाचे उत्तरदायित्व यांचा जवळून अनुभव घेता आला. याच अनुभवविश्वातून 'दैनिक गोदातीर समाचार'च्या रविवारच्या अंकात 'अक्षरगोदा' हे नवे सदर सुरू करताना मला विशेष आनंद होत आहे.

'अक्षरगोदा' हे नाव सुचताना अक्षर आणि गोदावरी या दोन प्रतिमा मनात एकत्र येतात, आणि दैनिकाचे नाव गोदातीर आहे. अक्षर म्हणजे विचारांचे माध्यम, तर गोदा म्हणजे प्रवाही जीवनाचे प्रतीक. गोदावरीचा प्रवाह अनेक प्रदेशांना जोडतो, त्यांना समृद्ध करतो आणि आपल्या काठांवर संस्कृतीची विविध रूपे फुलवतो. अक्षरांचाही प्रवास असाच असतो. ते एका मनातून दुसऱ्या मनात जातात, अनुभवांची देवाणघेवाण घडवतात, प्रश्न निर्माण करतात आणि प्रस्थापित विचारांना नवी दिशा देतात. म्हणूनच 'अक्षरगोदा' हे साहित्य आणि विचार यांच्या प्रवाही संवादाचे प्रतीक आहे.

माहितीच्या गर्दीत विचारांचे महत्त्व

आजच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांमुळे जगातील घडामोडी क्षणार्धात आपल्यापर्यंत पोहोचतात. मात्र माहिती मिळवण्याबरोबरच तिची सत्यासत्यता पडताळणे आणि सामाजिक संदर्भ समजून घेणेही आवश्यक आहे. एखादी बातमी वाचणे आणि तिचा अर्थ समजून घेणे, तसेच एखादे मत ऐकणे आणि त्याची तर्काच्या आधारे चिकित्सा करणे, या वेगळ्या प्रक्रिया आहेत.

विचार करण्याची सवय माणसाला माहितीचा ग्राहक न ठेवता सजग नागरिक बनवते. प्रश्न विचारणे, पुरावे तपासणे, विविध दृष्टिकोन समजून घेणे आणि स्वतःच्या मतांचा पुनर्विचार करणे, ही विवेकशील समाजाची लक्षणे आहेत. 'अक्षरगोदा'च्या माध्यमातून अशा चिकित्सक वृत्तीला चालना देण्याचा माझा प्रयत्न असेल.

साहित्य : जीवन समजून घेण्याची खिडकी

साहित्य हे जीवनाचे प्रतिबिंब असण्याबरोबरच जीवनाकडे पाहण्याची दृष्टी घडवते. कविता अंतर्मनातील भावनांना शब्द देते, कथा मानवी स्वभावाची गुंतागुंत उलगडते, कादंबरी व्यक्ती–समाज संबंधांचा विस्तृत पट मांडते, नाटक सामाजिक संघर्षांना सामोरे आणते आणि वैचारिक लेखन आपल्या समजुतींची फेरतपासणी घडवते.

एखादी साहित्यकृती वाचून संपली तरी तिचा प्रभाव संपत नाही. चांगले साहित्य प्रश्न निर्माण करते, अनुभवविश्व विस्तारते आणि दुसऱ्याच्या सुखदुःखांकडे संवेदनशीलतेने पाहायला शिकवते. त्याची खरी ताकद या परिवर्तनक्षमतेत आहे.

म्हणूनच 'अक्षरगोदा'मध्ये साहित्यकृतींचा परिचय करून देतानाच त्यांचा आशय, कलात्मकता, जीवनदृष्टी आणि सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न असेल. पुस्तकाचे कौतुक करणे म्हणजे परीक्षण नव्हे. गुणवैशिष्ट्ये ओळखतानाच मर्यादांचे संयत विश्लेषण करणे, ही चिकित्सक परीक्षणाची भूमिका असेल. साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करतानाही त्याच्या लेखनाचे स्वतंत्र मूल्यमापन आवश्यक आहे.

परंपरा, परिवर्तन आणि विवेक

परंपरेतून संस्कृतीचे सातत्य टिकते, सामूहिक स्मृती जपल्या जातात आणि पिढ्यांमध्ये नाते निर्माण होते. मात्र प्रत्येक जुनी गोष्ट स्वीकारावी किंवा प्रत्येक नवी गोष्ट योग्य मानावी, अशी भूमिका विवेकाशी सुसंगत नाही. परंपरेतील जीवनोपयोगी मूल्ये जपत कालबाह्य रूढींची चिकित्सा करणे आणि परिवर्तनातील सकारात्मक शक्यता समजून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेने यासाठी समृद्ध वारसा दिला आहे. संतांनी माणुसकी, समता आणि आत्म–परीक्षणाचा संदेश दिला. महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर समाजसुधारकांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले. या विचारपरंपरेचा अभ्यास वर्तमानातील प्रश्न समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतो.

'अक्षरगोदा'तून सामाजिक प्रश्नांकडे पाहताना त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक परिणाम आणि मानवी मूल्यांशी असलेले नाते समजून घेण्याचा प्रयत्न राहील. मतभिन्नता असू शकते; मात्र संवादाची दारे खुली ठेवणे, व्यक्तीपेक्षा विचारांची चिकित्सा करणे आणि तर्काधिष्ठित भूमिका मांडणे, हे या सदराचे सूत्र असेल.

मराठी भाषा, साहित्य आणि आपला परिसर

मराठी भाषेला संतसाहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत समृद्ध परंपरा लाभली आहे. तिचा अभिमान केवळ गौरवगाथेतून नव्हे, तर नव्या पिढीला वाचनाची गोडी लावणे, समकालीन साहित्याशी परिचय करून देणे, नवोदित लेखकांना समजून घेणे आणि मराठीचा ज्ञानभाषा म्हणून विकास साधणे, यातून व्यक्त होतो.

'गोदा' या नावामुळे आपल्या परिसरातील सांस्कृतिक जीवनाशी जोडले जाण्याची जबाबदारीही या सदरासमोर आहे. स्थानिक साहित्यिकांचे लेखन, साहित्यविषयक उपक्रम, सांस्कृतिक घडामोडी आणि परिसरातील समाजजीवन यांचे दर्शन या सदरातून घडावे, अशी माझी इच्छा आहे. व्यापक जगाचे भान राखताना आसपासच्या माणसांचे अनुभव, प्रश्न, संघर्ष आणि सर्जनशीलता यांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

या सदरात कविता, कथा, कादंबरी, वैचारिक पुस्तके, साहित्यिक व्यक्तिमत्त्वे, भाषाविषयक प्रश्न, सामाजिक–सांस्कृतिक घडामोडी आणि समकालीन वैचारिक विषयांचा प्रसंगानुरूप वेध घेतला जाईल. विषय वेगळे असले, तरी साहित्याची अभिरुची वाढवणे, विचारांना चालना देणे आणि समाजाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची दृष्टी विकसित करणे, हे समान उद्दिष्ट असेल.

वाचकांशी आणखी एक संवाद

वृत्तपत्रातील सदर हे लेखकाचे एकतर्फी भाष्य नसून लेखक–वाचक संवादाचे माध्यम असावे. 'अक्षरगोदा'च्या माध्यमातून असा संवाद घडवण्याची माझी अपेक्षा आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया आणि सूचना हा प्रवास अधिक समृद्ध करतील, असा विश्वास वाटतो.

या नव्या सदरासाठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल 'दैनिक गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. साहित्यिक आणि वैचारिक लेखनासाठी त्यांनी दाखवलेला विश्वास माझ्यासाठी आनंददायी आणि प्रेरणादायी आहे. ही संधी केवळ लेखनासाठी मिळालेली जागा नसून वाचकांशी अर्थपूर्ण संवाद साधण्याची जबाबदारीही आहे, याची मला जाणीव आहे.

'अक्षरगोदा'चा हा प्रवास वाचकांच्या सहकार्याने समृद्ध होईल, अशी आशा आहे. अक्षरांनी विचारांना दिशा द्यावी, विचारांनी विवेक जागवावा आणि विवेकातून संवेदनशील समाजनिर्मितीला हातभार लागावा, हीच या सदरामागील भूमिका आहे.

गोदावरीच्या प्रवाहाप्रमाणे अक्षरांचा हा प्रवासही अखंड वाहत राहो आणि त्यातून विचारांचे नवे किनारे गवसत राहोत!

–सु. मा. कुळकर्णी
नांदेड

सेवाभावी व्यक्तिमत्त्व: शिवाजीराव जाधव

मानवी जीवनात सत्ता, संपत्ती व कीर्ती याची प्राप्ती करणे हे प्रत्येक मानवाचे उद्दिष्ट असते, ते साध्य झाले तरीही यशस्वी जीवन म्हणता येत नाही.जे व्यक्ती स्वतः व स्वतः चे कुटुंब सुखी करून इतरांनाही सुखी करण्याचे अविरत कार्य सातत्याने करत असतात त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे शिवाजी नागोराव जाधव उमरदरीकर होत.

मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रामध्ये नांदेड जिल्ह्यातील उमरदरीच्या जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे नाव अग्रक्रमाने पुढे येते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नागोराव जाधव यांनी सन १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या रूपाने सर्वसामान्यांना शिक्षण मिळावे, शिक्षणापासून समाज वंचित राहू नये अशी धारणा ठेवून शिक्षणाची पायवाट घालून दिली. त्यांचे कार्य संस्थेचे विद्यमान अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांनी पुढे चालवत सामाजिक सेवेचे व्रत घेऊन वडील नागोराव जाधव यांच्यासह आपल्या घराण्याचे नाव उज्वल केले आहे. शिवाजीराव जाधव यांना दोन भाऊ अनुक्रमे अशोकराव व अविनाश तर तीन बहिणी सौ. क्रांती वडजे, सौ. ज्योती पवार व सौ. अंजली सोमण हे सर्व शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात लक्षवेधी कार्य करीत असतात.

माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शिवाजीराव जाधव एकनिष्ठपणे कार्य करीत आहेत. त्यांनी राजकारणाचा मार्ग पत्करल्यानंतरही शिक्षण क्षेत्राशी असलेल्या संबंधांना कधीही बाधा येऊ दिली नाही हे विशेष. शिवाजीराव जाधव यांच्या कार्यावर प्रभावित होऊन ग्रामपंचायत उमरदरी व सेवा सहकारी सोसायटी जनतेने त्यांच्याकडे सोपवली आहे. उमरदरी गावासह मुखेड तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. त्यांनी मुखेड शहरात रक्तदान शिबिरे आयोजित करणे व अनेक वेळा नेत्रचिकित्सांकडून नेत्र तपासणी करून शेकडो नागरिकांना मोफत चष्म्याचे वाटप करून गोरगरीब रुग्णांची सेवा केली व सातत्याने ते करीत करीत असतात.

सर्वांच्या सुख–दुःखात सहभागी होणे हा शिवाजीराव जाधव यांचा स्वभावगुणविशेष. आजतागायत शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आत्मविश्वासाने कार्य करून ते यशस्वी झाले आहेत. त्यामुळे ते कर्तृत्ववान, बहुआयामी अष्टपैलू व्यक्ती म्हणून सर्व परिचित आहेत. आज १ नोव्हेंबर रोजी त्यांचा वाढदिवस त्यानिमित्त अभीष्टचिंतनासोबत शिवाजीराव जाधव यांना वाढदिवसाच्या निमित्ताने निरोगी, दीर्घायुष्य लाभो हीच मनस्वी प्रार्थना व कोटी– कोटी शुभेच्छा!

–प्रल्हाद आयनेले
नांदेड
मो.९८९०६१६३०१

भाजप महानगरकडून 'लोकशाही बचाव, अराजकता हटाओ' अभियानांतर्गत रॅली

नांदेड (प्रतिनिधी)– भारतीय जनता पार्टी, नांदेड महानगर (दक्षिण व उत्तर) यांच्या वतीने आयोजित 'लोकशाही बचाव, अराजकता हटाओ' अभियानांतर्गत आयोजित रॅली राज कॉर्नर ते औद्योगिक वसाहतीतील नानी पार्क पर्यंत काढण्यात आली. त्यानंतर भाजपा महानगर कार्यालय येथे जाहीर सभा घेण्यात आली. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्यावतीने भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा विभागीय संघटन मंत्री सुनील राणे, नांदेड महानगर अध्यक्ष आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार भीमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता संतोष मुळे, नितीन काळे, युवती राज्यप्रमुख शांभवी साले, ॲड. दिलीप ठाकूर, गोविंदराव पाटील नागेलीकर, संजय देशमुख लहानकर, ज्योती कल्याणकर, मंगाराणी आंबुलगेकर, सुषमा थोरात, पुनीता रावत यांच्यासह नांदेड शहरातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

किनवटमध्ये कॅनरा बँकेच्या खात्यातून दोन दिवसांत १ लाख ९६ हजारांची परस्पर उचल

किनवट (प्रतिनिधी)– शहरातील कॅनरा बँकेच्या शाखेतील एका खातेदाराच्या बँक खात्यातून अवघ्या दोन दिवसांत तब्बल १ लाख ९६ हजार ३ रुपयांची रक्कम अनधिकृतपणे दुसऱ्या खात्यात वळती झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

किनवट शहराच्या इस्लामपुरा भागातील जबिरोद्दीन चव्हाण यांच्या कॅनरा बँकेतील खात्यातून २० ऑक्टोबर रोजी ९८ हजार १ रुपयांची, तर २१ ऑक्टोबर रोजी ९८ हजार २ रुपयांची रक्कम परस्पर हस्तांतरित करण्यात आली. सदर व्यवहार आपण केले नसल्याचे खातेदाराचे म्हणणे आहे. या प्रकरणी किनवट ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

आदित्य ठाकरेंच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या १०० खाटांच्या रुग्णालयाचे शिवसैनिकांकडून उद्घाटनाचे प्रयत्न

नांदेड (प्रतिनिधी)– वाडी बु. येथील १०० खाटांच्या रूग्णालयाचे उद्घाटन करण्याचा प्रयत्न शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. या रूग्णालयाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी होणार आहे.

वाडी बु. येथील शंभर खाटांच्या या रुग्णालयासाठी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. तर शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या हस्ते या रुग्णालयाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला होता. त्यामुळे ज्या रुग्णालयाची पायाभरणी ठाकरे सरकारच्या काळात झाली, त्याचे उद्घाटन १ नोव्हेंबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांच्या हस्ते उद्घाटनापुर्वीच शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने दि. ३१ ऑक्टोबर रोजी उद्घाटनाचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी जिल्हाप्रमुख बबन बारसे, तालुकाप्रमुख सुनील कदम, शहरप्रमुख अर्जुनसिंह ठाकूर, नवनाथ जोगदंड निळेकर, युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर, उपजिल्हासंघटक माधवराव पांचाळ यांच्यासह अनेक शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ चा उत्साहात शुभारंभ

नाशिक (प्रतिनिधी)– त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पूर्वतयारी आणि धार्मिक आयोजनाचा भव्य शुभारंभ देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गोदावरी नदीच्या पवित्र तीरावर आयोजित या ऐतिहासिक सोहळ्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. या महाकुंभ सोहळ्याची झलक दर्शवणारी ५ छायाचित्रे आणि सविस्तर वृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

नाशिकच्या पवित्र रामकुंड परिसरात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पूर्वतयारीचा व धार्मिक आयोजनाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रपतींनी विधीवत पूजा करत गोदावरी मातेचे पूजन केले. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभाची परंपरा जेवढी प्राचीन आहे, तेवढीच ती समृद्ध आहे. शतकानुशतके आयोजित होणारा कुंभमेळा हा भारताची सांस्कृतिक-आध्यात्मिक एकता आणि सातत्याचे जिवंत प्रतीक आहे, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

गोदावरी नदीच्या पावन काठावर राष्ट्रपतींच्या उपस्थितीत भव्य महाआरती पार पडली. या आध्यात्मिक सोहळ्यात हजारो भाविक आणि साधू-संत सहभागी झाले होते. हरिद्वारचा गंगाकिनारा, प्रयागराजचा त्रिवेणी संगम, उज्जैनची क्षिप्रा नदी आणि नाशिकचा गोदावरी तीर येथे आयोजित होणारे कुंभमेळे जगभरात प्रसिद्ध आहेत. या सोहळ्यांमध्ये शतकांपासून एकत्र येणारे लाखो भाविक भारताची सामाजिक समरसता दर्शवतात, असे विचार राष्ट्रपतींनी मांडले. या महाआरती आणि उद्घाटन सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे नाशिकमधील ६०० ते ६५० गावांमधून आलेले सुमारे ६००० आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संबोधनात सांगितले की, सनातन संस्कृती शाश्वत असून कुंभ हे तिचे असे रूप आहे, जिथे विविध पंथ, संप्रदाय एकत्र येतात आणि या आदिवासी बांधवांची उपस्थिती हीच सनातन संस्कृतीची खरी ओळख आहे.

एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित भारतीय हवाई दलाचे नवे प्रमुख

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांनी शनिवारी भारतीय हवाई दलाच्या प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली. तब्बल ४३ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेले एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांच्यानंतर दीक्षित यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे.

ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे आणि धोरणात्मक नियोजनाचा अनुभव असलेले आशुतोष दीक्षित यापूर्वी भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून कार्यरत होते. या पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी एकात्मिक संरक्षण दलाच्या मुख्यालयात चीफ्स ऑफ स्टाफ कमिटीच्या अध्यक्षांचे प्रमुख म्हणून काम पाहिले होते.

एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांची लष्करी कारकीर्द जवळपास चार दशकांची आहे. ते लढाऊ वैमानिक आणि प्रायोगिक चाचणी वैमानिक आहेत. त्यांच्या नावावर ३,५०० तासांहून अधिक विमान उड्डाणाचा अनुभव आहे. मिराज-२०००, जॅग्वार, मिग श्रेणीतील विविध विमाने, तेजस, हॉक, किरण, एएन-३२ आणि आयएल-७८ यांसारखी विमाने त्यांनी हाताळली आहेत.

टी.सी. हरवली

माझी पौर्णिमा तुळशीराम हटकर या नावाची दहावी नापासची टी.सी. मुगट ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

– संपर्क पत्ता –
पौर्णिमा तुळशीराम हटकर रा. मुगळ ता. मुदखेड जि. नांदेड मो.नं. ९३०९३८९९९०

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

सनद हरवली

माझी विजयकुमार गुलाबराव देशमुख या नावाची दहावी व बारावी पासची सनद नांदेड ते विष्णुपूरी प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क पत्ता– विजयकुमार गुलाबराव देशमुख रा. काळेश्वर नगर, विष्णुपूरी नांदेड मो.नं. ७८४०९०४१४३

टी.सी. हरवली

माझी खैसरजहाँ शेख हुसेन या नावाची दहावी नापासची टी.सी. नांदेड येथे प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

– संपर्क पत्ता –
खैसरजहाँ शेख हुसेन मो. ९५९७९००३१३

Change In Name

I HAVE CHANGED MY NAME FROM (OLD NAME):- BANDEWAR ASHISHKUMAR ASHOKRAO TO (NEW NAME):- ASHISH ASHOKRAO BANDEWAR ADDRESS:- "AT POST TAMSA TQ HADGAON DIST NANDED-431713

Change In Name

My old Name is **MOHAMMED SULEMAN THKIYA ABDUL QUADER THKIYA** Which now I am Changing as New Name **MOHAMMAD SULEMAN THEKIYA** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 9-4-636, Galli No 1, Mafco Road, Qayyum Plot, Itwara Nanded, PO: Itwara Nanded, DIST: Nanded, Maharashtra

Change In Name

My old Name is **WAHEDA BANO** Which now I am Changing as New Name **WAHIDA BANU ABDUL KADER THEKIYA** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: W/O Ab.Kadar Tekiya, House No-9-4-636 Sai Nagar, Nanded, DIST: Nanded, Maharashtra - 431604

Change In Name

My old Name is **ABDUL QUADER THKIYA** Which now I am Changing as New Name **ABDUL KADER ABDUL SATTAR THEKIYA** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: S/O Ab. Sattar Thekiya, House No 9-4-636 Kayyum plot, Sai Nagar, nanded, DIST: Nanded, Maharashtra -431604

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुले) छत्रपती संभाजीनगर
सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुली) नाशिक

Notification for admission to SPI

१. शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता छत्रपती संभाजीनगर येथील सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था (मुले) यांच्या ५१ व्या तुकडीसाठी व नाशिक येथिल सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था (मुली) यांच्या ५ व्या तुकडीसाठी इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. **पात्रता:-** (अ) अविवाहित (मुलगा / मुलगी). (ब) **महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) तसेच कर्नाटक राज्यातील फक्त बिदर, बेळगावी अणि कारवार जिल्हयाचे अधिवासी.** (क) जन्म तारीख ०१ जुलै २०१० ते ०१ जुलै २०१३ च्या दरम्यान (दोन्ही दिवस धरून) (ड) वर्ष २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत (दहावी) बोर्ड परीक्षेला बसणारा / बसणारी. (इ) जून-२०२७ मध्ये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असावे.

३. **शारीरिक पात्रता:-** सैन्यदलात अधिकारी बनण्यासाठी UPSC ने NDA आणि INA साठी दिलेल्या सर्व शारीरिक निकषांस पात्र असावे. हे निकष UPSC (https://www.upsc.gov.in) तथा **संस्थेच्या संकेत** www.spicsn.com स्थळावर उपलब्ध आहेत. **प्रमुख निकष पुढीलप्रमाणे**:-उंची - कमीत कमी मुलांसाठी १५७ सें.मी. मुलींसाठी १५२ सें. मी. रातांधळेपणा किंवा रंगांधळेपणा नसावा. मुलांसाठी छाती - ७४ से.मी. ५ से.मी. फुगवून. NDA / INA प्रवेशासाठी UPSC च्या आधिसूचनेनुसार डोळयांची क्षमता असावी.

४. **लेखी परीक्षा आणि मुलाखत :-** पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा इंग्रजी माध्यमातून विविध परीक्षा केंद्रांवर दिनांक **०४ एप्रिल २०२७** रोजी घेतली जाईल. परीक्षेमध्ये एकाच प्रश्नपत्रिकेत ६०० गुणांचे बहुपर्यायी Multiple Choice Questions, ७५ प्रश्न गणिताचे आणि ७५ प्रश्न सामान्यज्ञान General Ability Test (GAT) असे एकूण १५० प्रश्न असतील. प्रत्येक योग्य उत्तराला (४) गुण व चुकीच्या उत्तरास (-१) गुण मिळतील. लेखी परीक्षा साधारणत: इयत्ता ९ वी ते १० वीच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी व वैद्यकिय चाचणीसाठी बोलवण्यात येईल.

५. मुलांसाठी ऑनलाईन अर्ज www.spicsn.com आणि मुलींसाठी ऑनलाईन अर्ज www.girlspinashik.spicsn.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. परीक्षा शुल्क रूपये ४५०/- (परत न करता येण्याजोगे) ऑनलाईन फक्त क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेटबँकीग इत्यादी व्दारे भरावे. डिमांड ड्राफ्ट किंवा चलानव्दारे भरलेले परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. प्रवेश अर्ज संस्थेच्या अटी व शर्ती नुसार भरलेला नसल्यास अर्ज नामंजूर होइल, तसेच प्रवेश परीक्षा शुल्क परत मिळणार नाही.

६. **प्रवेश अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख : २० फेब्रुवारी २०२७.**

७. **हॉल तिकीट:-** दिनांक **२० मार्च २०२७** नंतर संस्थेच्या संकेत स्थळावरून डाऊनलोड करून घेता येतील.

८. परीक्षा संबधीत अधिक सूचनांसाठी www.spicsn.com आणि www.girlspinashik.spicsn.com हे संकेतस्थळ वेळोवेळी तपासावे. परिक्षेसंबंधी सर्व सुचना / माहिती फक्त याच दोन्ही संकेतस्थळांवर उपलब्ध असतील.
"उमेदवारांना इतर कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून संपर्क केला जाणार नाही".

स्वाक्षरीत/-
(मकरंद देशमुख)
कर्नल (निवृत्त)
संचालक

जाहिर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भोकर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १९५/२०२६
माधव नारायण फोले वि. निबंधक (जन्म आणि मृत्यु) , ग्रामिण रुग्णालय भोकर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- **माधव नारायण फोले,**
वय- ३२ वर्षे, धंदा- शेती ,
रा. ताटकळवाडी ता. भोकर जि. नांदेड
---------- विरुध्द----------
गैरअर्जदार :- निबंधक (जन्म-मृत्यू),
ग्रामिण रुग्णालय भोकर
ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञां मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची/यांचा मुलगी/मुलगा **नारायण माधव फोले,** रा. ताटकळवाडी ता. भोकर जि. नांदेड यांचा जन्म दिनांक **२८/०८/२०२२** रोजी ग्रामिण रुग्णालय भोकर , ता. भोकर जि. नांदेड येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक **२९/१०/२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यांत आले.

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, भोकर

जाहीर प्रगटन

भोकर येथील सह. दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री. आर. आर.पत्की साहेब दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर जि. नांदेड
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २७८/२०२६

१) तुळसाबाई भ्र. कबीरदास भिसे,
वय- ५५ वर्षे, धंदा- घरकाम,
२) सतिश पि. कबीरदास भिसे,
वय: २५ वर्षे, धंदा- मजुरी,
३) संतोष पि. कबीरदास भिसे,
वय: २३ वर्षे, धंदा- मजुरी,
४) श्रीकांत पि. कबीरदास भिसे,
वय: २० वर्षे, धंदा- मजुरी,
सर्व रा. ताटकळवाडी, ता. भोकर, जि. नांदेड ...अर्जदार
विरूध्द
निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत कबीरदास पि. नारायण भिसे यांचे वारस आहेत. मयत कबीरदास पि. नारायण भिसे यांचा मृत्यू दि. २२/०८/२०२४ रोजी मौ. ताटकळवाडी, ता. भोकर, जि. नांदेड येथे मृत्यू झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: न्यायालयात दिनांक ३०/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून
क. लिपीक — अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर — दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

जाहीरप्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या. क. स्तर भोकर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री. आर.एस. इरले साहेब सह. दि. न्यायालय क. स्तर, भोकर.
किरकोळ अर्ज क्र. २९१/२०२६

1) सय्यद हमीदा बेगम भ्र. सय्यद रफिक
वय- ६१ धंदा- घरकाम
संपर्क :- ९६८९०६०६०८
2) सय्यद खालेद पि. सय्यद रफिक
वय- ४३ धंदा- मजुरी
३) सय्यद युनूस पि. सय्यद रफिक
वय- ४१ धंदा- मजुरी
४) सय्यद सईद पि. सय्यद रफिक
वय- ३८ धंदा- नौकरी
५) साजेदमियाँ रफिकमिया सय्यद
वय- ३८ धंदा- मजुरी
६) सय्यद माजीद पि. सय्यद रफिक
वय- ३४ धंदा- मजुरी
७) सय्यद जुनेद पि. सय्यद रफिकसाब
वय- ३१ धंदा- शिक्षण
सर्व रा. समता नगर, ता. भोकर, जि. नांदेड.
विरूध्द
निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत सय्यद रफिक पि. सय्यद इब्राहिम यांचे वारस आहेत. मयत सय्यद रफिक पि. सय्यद इब्राहिम यांचा मृत्यू दिनांक ३१/०३/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक ०८/१२/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून
क. लिपीक — स.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर. — सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर.

जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेच्या व संबंधिताच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, नां.वा.श.म.न.पा. हद्दीतील राजेंद्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, म. नांदेड मधील सर्व्हे नं. 47/2 पैकी सि.टी.सर्व्हे नं. 8411 पैकी प्लॉट क्र. 27/ब क्षेत्रफळ 1800 चौ. फूट ज्याच्या चतु:सिमा-

पुर्वेस : श्री. गणेश वामनराव देशमुख यांचे घर, **पश्चिमेस :** रोड
दक्षिणेस : श्री. नरेश परमाणी यांचे अपर्टमेंट **उत्तरेस :** रोड

येणेप्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉट क्र. 27/ब क्षेत्रफळ 1800 चौ. फूट. हा संस्थेने संस्थेचे सभासद श्री. केशवराव पि. वामनराव देशमुख यांना प्लॉट वाटप प्रमाणपत्राव्दारे वाटप केलेला असून केशवराव पि. वामनराव देशमुख यांचा दि.25/12/2022 रोजी मृत्यु झाला असल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे कायदेशीर वारसांनी सन्माननीय न्यायालयातून वारस प्रमाणपत्र काढून सदरच्या वारसा प्रमाणपत्राधारे वर नमूद प्लॉट क्र. 27/ब फूट हा वारसाआधारे अर्जदार श्री. अरुण पि. केशवराव देशमुख यांच्या नावे हस्तांतर करणेस्तव विनंती अर्ज सादर करुन सोबत न्यायालयाचे वारसाप्रमाण पत्र, इतर वारसांचे संमतीपत्र व हस्तातराणासाठीची विहीत नमुन्यातील इतर अवश्यकती कागदपत्र सादर केलेली आहेत.

तरी कागदपत्रांची छाननी करुन श्री. अरुण पि. केशवराव देशमुख यांच्या यांना संस्थेचा सभासद करुन घेऊन सदरील प्लॉट क्र. 27/ब हा त्यांच्या नावे हस्तांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा ऊजर असल्यास अथवा सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापासुन 7 (सात) दिवसाचे आत संबंधितानी आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या कार्यालयात लिखित स्वरुपात सादर करावा. मुदतीनंतर श्री. अरुण पि. केशवराव देशमुख यांना संस्थेचा सभासद करुन सदरील प्लॉट त्यांच्या नावे हस्तांतर करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

प्रगटन देनार
अध्यक्ष/सचिव,
राजेंद्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्था
म. नांदेड

मार्फत
ॲड. शैलेष साहेबराव देशमुख
3, गंगासदन राजेंद्रनगर, नांदेड
मो. क्र. 9422056330

जाहीर प्रगटन

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.

प्रति,
संपादक,
दैनिक गोदातीर नांदेड.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १४७ / २०२६
नरसिंग वि. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव.

नरसिंग पि. राजेश्वर खांडरे
वय- ३६ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. पिंपळगाव ता. बिलोली जि. नांदेड .. अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय पिंपळगाव,
ता. बिलोली.जि. नांदेड .. गैरअर्जदार

मागणी - जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३(३), प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म / मृत्यूची नोंद कायदा १९६९, कलम १३(३) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा नामे ज्ञानेश्वर पि. नरसिंग खांडरे जन्म **दिनांक १८/०५/२०१२,** राहणार- पिंपळगाव, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीची तारीख **२१-११-२०२६** रोजी ठेवण्यात आली.
आज दिनांक १३-१०-२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

"आदेशावरून"
सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी न्यायालय बिलोली.

जाहीर प्रगटन

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.

प्रति,
संपादक,
दैनिक गोदातीर नांदेड.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १४८ / २०२६
नरसिंग वि. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव.

नरसिंग पि. राजेश्वर खांडरे
वय- ३६ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. पिंपळगाव ता. बिलोली जि. नांदेड .. अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय पिंपळगाव,
ता. बिलोली.जि. नांदेड .. गैरअर्जदार

मागणी - जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३(३), प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म / मृत्यूची नोंद कायदा १९६९, कलम १३(३) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगी नामे मुक्ताबाई पि. नरसिंग खांडरे जन्म **दिनांक १८/०५/२०१२,** राहणार- पिंपळगाव, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीची तारीख **२१-११-२०२६** रोजी ठेवण्यात आली.
आज दिनांक १३-१०-२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

"आदेशावरून"
सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी न्यायालय बिलोली.

जाहीरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०९/ २०२६

अर्जदार : भोजीराम पि. महादू कोपरे, वय ७६ वर्षे, धंदा शेती व मजुरी,
सर्व रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड — **पुढील तारीख – ३१.१०.२०२६**
विरुध्द.
गैरअर्जदारः १) गीताबाई भ्र. महादू कोपरे, वय ७० वर्षे, धंदा निरंक, रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड
२) लक्ष्मण पि. महादू कोपरे, वय ५२ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड
३) शंकर पि. महादू कोपरे, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड
४) मधुकर पि. महादू कोपरे, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड
५) नागनाथ पि. महादू कोपरे, वय ३५ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. माचनुर, ता. बिलोली, जि. नांदेड
६) लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मेंदरस्पल्ली, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली, ता. धर्माबाद, जि. नांदेड
७) विटाबाई भ्र. नागभूषण रामदगे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली, ता. धर्माबाद, जि. नांदेड
८) सुनीताबाई भ्र. केशव इबीतवाड, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. छाता, कुबीर मंडल, जि. अदिलाबाद
९) पल्लवी भ्र. माधव क्षीरसागर, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. वैफना, ता. हदगांव, जि. नांदेड

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक ०१ ते ०९ हे **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०२ ही **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांची दुसरी पत्नी आहे. तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र. ०२ ते ०९ हे **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे अपत्ये आहेत. **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचा मृत्यु दिनांक २४/०३/२०२१ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक ०१ ते ०९ ह्यांना **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन/नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत महादु पि. मदारी कोपरे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

मातुळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

निवासस्थाने वापर न करता दोन-तीन वर्षांतच दुरुस्तीची वेळ

भोकर (प्रतिनिधी)– राज्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकामांवर निर्बंध असल्याची माहिती समोर येत असताना, भोकर तालुक्यातील मातुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात पेवर ब्लॉक, अंतर्गत रस्त्यांची कामे आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीची कामे सुरू असल्याचे दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी निदर्शनास आले. या सर्व कामांची सखोल चौकशी करण्याची मातुळ व परिसरातील ग्रामस्थांकडून गरज व्यक्त केली जात आहे.

मातुळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाच्या काळातच कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारण्यात आली होती. मात्र, स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार, ही निवासस्थाने बांधण्यात आल्यापासून आजपर्यंत कर्मचाऱ्यांकडून एकदाही वापरली गेलेली नाहीत. वापराअभावी ही निवासस्थाने धूळखात पडून असल्याचे सांगितले जात आहे.

असे असताना, अवघ्या दोन-तीन वर्षांच्या कालावधीतच या निवासस्थानांच्या दुरुस्तीची वेळ का आली, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. संबंधित इमारतींचे बांधकाम करताना वापरण्यात आलेले साहित्य, बांधकामाची गुणवत्ता, तांत्रिक तपासणी आणि काम पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलेले मूल्यांकन यांची चौकशी होणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्यांसाठी शासनाच्या निधीतून निवासस्थाने बांधण्यात आली; मात्र ती वापरात न येता पडून राहिली आणि आता पुन्हा दुरुस्तीवर खर्च केला जात असेल, तर या खर्चाची आवश्यकता आणि औचित्य तपासले गेले पाहिजे. दुरुस्तीच्या नावाखाली अनावश्यक खर्च होत आहे का? शासनाच्या पैशाचा अपव्यय होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे संबंधित विभागाने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

या परिस्थितीवरून भ्रष्टाचार झाल्याचा निष्कर्ष तातडीने काढता येणार नसला, तरी बांधकामाचा दर्जा, दुरुस्तीची गरज, मंजूर निधी आणि प्रत्यक्ष खर्च यांची स्वतंत्र तपासणी केल्याशिवाय वस्तुस्थिती स्पष्ट होणार नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात सुरू असलेल्या अंतर्गत रस्त्यांची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची असल्याचा आक्षेप ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या बांधकामांमध्ये दर्जेदार साहित्याचा वापर, तांत्रिक निकषांचे पालन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून नियमित देखरेख होणे अपेक्षित आहे.

मात्र, या कामांमध्ये वापरण्यात येणारे साहित्य, कामाची जाडी व मोजमाप, अंदाजपत्रकातील तरतुदी आणि प्रत्यक्षात झालेल्या कामाची गुणवत्ता यांची पडताळणी होणे आवश्यक आहे. संबंधित कामांची तांत्रिक तपासणी करून त्रुटी आढळल्यास जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

पेवर ब्लॉक बसविण्याचे काम, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम आणि कर्मचारी निवासस्थानांची दुरुस्ती या सर्व कामांचे स्वतंत्रपणे मूल्यांकन करून मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत प्रत्यक्ष काम किती आणि कशा दर्जाचे झाले आहे, हे तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या प्रकरणासंदर्भात भोकरचे तालुका आरोग्य अधिकारी संदेश जाधव यांच्याकडे भ्रमणध्वनीद्वारे माहिती विचारली असता, 'मला याबाबत कसलीही माहिती नाही; यासंदर्भात बांधकाम विभागाकडे विचारा,' असे उत्तर मिळाल्याचे सांगण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात विविध कामे सुरू असताना संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांकडे त्याबाबत माहिती नसल्याचे उत्तर मिळाल्याने कामांची प्रशासकीय जबाबदारी, देखरेख आणि विभागांमधील समन्वय याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. या कामांची मंजुरी कोणी दिली, त्यावर देखरेख कोण करीत आहे आणि कामांचा दर्जा तपासण्याची जबाबदारी कोणाकडे आहे, याबाबत अधिकृत खुलासा होणे आवश्यक आहे.

या कामांशी संबंधित कंत्राटदार म्हणून श्री कृष्णा कन्स्ट्रक्शन, दिवशी यांचे नाव समोर आले आहे. तथापि, संबंधित कंत्राटदाराला नेमका कोणता कार्यादेश देण्यात आला, कामासाठी किती निधी मंजूर झाला, कामाची मुदत किती आहे आणि गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे का, याची अधिकृत माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर चारा व्यवस्थापनाचे नियोजन

सगरोळीत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन

नांदेड (प्रतिनिधी)– एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे उद्‌भवू शकणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुधनाकरिता वर्षभर सकस चारा उपलब्ध व्हावा, तसेच जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी मृदासंवर्धन आणि संतुलित खत वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड-२ येथे विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात १०३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याच्या वितरणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर चारा प्रक्रिया व साठवणूक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे पशुविज्ञान विषय विशेषज्ञ डॉ. निहाल मुल्ला यांनी वाळलेल्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे आणि त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून समजावून सांगितले. तसेच हंगामात उपलब्ध होणाऱ्या हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार केल्यास टंचाईच्या काळातही पशुधनासाठी सकस चारा उपलब्ध ठेवता येतो, असे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या खेत बचाओ अभियानांतर्गत जमिनीचे आरोग्य जपणे, मृदासंवर्धनाच्या उपाययोजना राबविणे आणि माती परीक्षणानुसार संतुलित खतांचा वापर करणे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी रासायनिक खतांचा गरजेनुसार वापर, सेंद्रिय निविष्ठांचा अवलंब आणि मृदासंवर्धनाच्या उपाययोजनांचे महत्त्व यावर यावेळी भर देण्यात आला.

या कार्यक्रमास उपविभागीय कृषी अधिकारी विठ्ठल गीते, बिलोलीचे तालुका कृषी अधिकारी विवेक गुडूप, नांदेड येथील आत्माचे उपप्रकल्प संचालक अर्चना गुंजकर, पशुधन विकास अधिकारी विकास गड्डेवाड यांच्यासह कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

शासकीय योजनांची माहिती, चारा प्रक्रिया व साठवणुकीचे प्रत्यक्ष तंत्रज्ञान आणि मृदासंवर्धनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला.

नागोराव तिप्पलवाड यांना नॅशनल अवॉर्ड २०२६ जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)– शिक्षण, सामाजिक सेवा, रक्तदान जनजागृती, कला आणि वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजप्रबोधनासाठी कार्य करणारे नागोराव मारोती तिप्पलवाड ऊर्फ एन. टी. बरबडेकर यांना बॉम्बे ब्लड ग्रुप ऑर्गनायझर इंडियाच्या वतीने नॅशनल अवॉर्ड २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

त्यांच्या विविध क्षेत्रांतील योगदानाची दखल घेत त्यांनी आजपर्यंत २५ वेळा रक्तदान केले आहे. ते ओ निगेटिव्ह रक्तदाता आहेत. त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाल्याची माहिती बॉम्बे ब्लड ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विक्रम यादव यांनी दिली आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

डीआरएम प्रदीप कामले यांनी पूर्णा येथील रेल्वे सुविधा व पायाभूत सुविधांची पाहणी केली

नांदेड (प्रतिनिधी)– येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी त्यांच्या अधिकृत पाहणी कार्यक्रमांतर्गत पूर्णा येथे विविध रेल्वे सुविधा व पायाभूत सुविधांची सविस्तर पाहणी केली.

पाहणीदरम्यान त्यांनी हुजूर साहिब नांदेड ते पूर्णा या रेल्वे मार्गादरम्यान मागील खिडकीतून पाहणी (Rear-Window Inspection) करून या मार्गावरील रेल्वे पायाभूत सुविधा तसेच परिचालनाशी संबंधित व्यवस्थांचा आढावा घेतला.

पूर्णा येथे कामले यांनी पूल क्रमांक ३४० आणि वळण क्रमांक ४३ यांची पाहणी करून त्यांची सद्यस्थिती तसेच करण्यात येत असलेल्या देखभाल व्यवस्थेचा आढावा घेतला. या पाहणीदरम्यान पायाभूत सुविधांची सुरक्षितता, देखभालीचे मानदंड आणि परिचालनाच्या आवश्यकतांवर विशेष भर देण्यात आला.

तसेच, त्यांनी अपघात निवारण रेल्वेगाडी (Accident Relief Train-RT) आणि स्वयंचलित वैद्यकीय मदत वाहन (Self-Propelled Medical Relief Van - SPMRV) यांचीही पाहणी केली. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देण्यासाठी त्यांची सज्जता व परिचालनात्मक तयारी यांचा त्यांनी आढावा घेतला.

याशिवाय, त्यांनी पूर्णा येथील क्रू लॉबी आणि रनिंग रूम यांची पाहणी करून लोको पायलट व इतर रनिंग कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा, त्यांच्या विश्रांती आणि कामकाजासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थांचा आढावा घेतला.

परोपकार, सद्वर्तन आणि ज्ञानातूनच जीवनकल्याण -हभप बा.ल. चोथवे महाराज

नांदेड (प्रतिनिधी) –पापापासून दूर राहणे, पुण्यकर्म करणे आणि निर्मळ वृत्तीच्या सज्जनांची संगत ठेवणे, हीच जीवनकल्याणाची त्रिसूत्री आहे. केवळ धार्मिक ग्रंथांचे वाचन किंवा प्रवचन श्रवण करून जीवनात परिवर्तन घडत नाही, तर ग्रंथांमधील विचार प्रत्यक्ष आचरणात आणणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार ह.भ.प. बा. ल. चोथवे महाराज यांनी केले.

नांदेड शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राधिकानगर परिसरातील श्री सिद्धिविनायक मंदिर व साई-गणेश देवस्थानच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पाच दिवसीय धार्मिक महोत्सवात ते बोलत होते. २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व आध्यात्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रवचनात नारदगीतेतील सूत्रांचा आधार घेत चोथवे महाराज यांनी जीवन जगण्याचा आध्यात्मिक दृष्टिकोन स्पष्ट केला. महाभारतातील शांतीपर्वाचा संदर्भ देताना युद्धानंतर नैराश्यात गेलेल्या धर्मराजाला भीष्माचार्यांनी केलेल्या उपदेशाचे महत्त्व त्यांनी विशद केले. संकटाच्या काळात योग्य मार्गदर्शन आणि विवेकपूर्ण विचार माणसाला सावरण्याचे बळ देतात, असे ते म्हणाले.

संत तुकाराम महाराजांच्या 'पाप ते परपीडा, पुण्य ते परोपकार' या विचाराचा दाखला देत दुसऱ्याला वेदना न देणे आणि अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदतीचा हात देणे, हीच पुण्यकर्माची खरी ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

चांगली संगत माणसाच्या विचारांवर आणि व्यक्तिमत्त्वावर संस्कार करते. त्यामुळे संतवाङ्‌मयाचे वाचन करण्याबरोबरच त्यातील शिकवण आपल्या जगण्यात उतरविणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यक्रमांमध्ये गाणे, मनोरंजन आणि संस्थांच्या प्रचाराला अधिक महत्त्व मिळत असून, त्यामुळे ग्रंथांमधील मूलभूत विचार मागे पडू नयेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. वक्तृत्व ही कला असली, तरी माणसाचा खरा प्रभाव त्याच्या आचरणातून निर्माण होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्या म्हणजे जीवनाला दिशा देणारा डोळा आहे. सत्य, विवेक आणि ज्ञान यांची जोपासना केल्याशिवाय जीवन समृद्ध होऊ शकत नाही. सत्याचा अर्थ केवळ खरे बोलणे एवढाच मर्यादित नसून परिस्थितीचा योग्य विचार करून विवेकाने वागणे, हाही त्याचा व्यापक अर्थ आहे, असे त्यांनी सांगितले.

गुरुकुल विद्यालयात 'सुरक्षित बचपन अभियान' संपन्न

धर्माबाद (प्रतिनिधी) – गुरुकुल विद्यालय धर्माबाद येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'सुरक्षित बचपन अभियान' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल मित्र मंडळ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष पी. एल. गोपतवाड होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून जी. आर. एकाडे, दिवाणी न्यायाधीश, न्यायालय धर्माबाद, ॲड. पूजा चव्हाण, ॲड. गंगाप्रसाद चोपडे तसेच आर. एस. खंदारे, वरिष्ठ लिपीक उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बालसुरक्षेचे महत्त्व, बालकांचे हक्क, बालकांवरील अन्याय व अत्याचारांपासून संरक्षण आणि कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी योग्य मदत कशी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. बालकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, त्यांच्यामध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि स्वतःच्या हक्कांविषयी सजग करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी बालसुरक्षेविषयी जागरूक राहण्याचा संदेश घेतला. शाळा आणि समाज यांनी एकत्रितपणे बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

दुष्काळमुक्त, विकसित नांदेडसाठी देशभरातील कंपन्यांचा पुढाकार

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हास्तरीय कार्यशाळा

नांदेड (प्रतिनिधी)– संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासह नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी देशभरातील कंपन्यांनी सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीच्या माध्यमातून सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. केअरींग फ्रेंडस् फाऊंडेशनने जिल्ह्याच्या विकासासाठी १ कोटी रुपयांचा, तर डायजीओ इंडिया लिमिटेडने मृद व जलसंधारणासाठी १० लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत ही सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. या कार्यशाळेत देशभरातील ५० हून अधिक कंपन्यांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचीही उपस्थिती होती.

जिल्ह्याच्या प्राधान्यक्रमातील विकासकामांसाठी सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीचे प्रभावी नियोजन करणे आणि जिल्हा प्रशासन व कंपन्यांमध्ये दीर्घकालीन सहकार्य निर्माण करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

कार्यशाळेदरम्यान केअरींग फ्रेंडस् फाऊंडेशनने नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले. तसेच संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डायजीओ इंडिया लिमिटेडने १० लाख रुपयांचा निधी देण्याची तयारी दर्शविली. याशिवाय पुढील आर्थिक वर्षात जिल्ह्याच्या विकासात्मक गरजांनुसार मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले. या सहकार्यामुळे जिल्ह्यातील प्राधान्यक्रमाच्या विकासकामांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होणार आहे.

सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधी देणाऱ्या कंपन्या, शासकीय विभाग आणि प्रकल्पांची अंमलबजावणी करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी स्वतंत्र जिल्हास्तरीय संकेतस्थळ विकसित करण्याचा प्रस्ताव कार्यशाळेत मांडण्यात आला. या माध्यमातून जिल्ह्यातील विकासाच्या गरजा, प्रस्तावित कामे, निधीची आवश्यकता आणि अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

प्रा. अब्दुल रेहमान यांना पीएच. डी.

नांदेड (प्रतिनिधी)– एमजीएम महाविद्यालयातील यंत्रशास्त्र विभागातील प्रा. अब्दुल रेहमान मोहम्मद इक्बाल यांना स्वारातीम विद्यापीठाने यंत्रशास्त्र अभियांत्रिकी विषयातील पीएच. डी. पदवी नुकतीच प्रदान केली आहे.

प्रा. रेहमान यांनी त्यांचा वेट रीडक्शन ऑफ लाईट मोटार व्हेकल युसींग कंपोझिटस् या विषयावरील प्रबंध एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेडच्या डायरेक्टर डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात पूर्ण करून विद्यापीठास सादर केला होता. हा प्रबंध विद्यापीठाने स्वीकारला आणि पीएच. डी. प्रदान करण्यात आली. त्यांच्या या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

भोकरमध्ये महाविकास आघाडीचा जल्लोष



भोकर (प्रतिनिधी)– मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी १८ हजार १२४ मतांच्या फरकाने विजय मिळवला. या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी भोकर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात महाविकास आघाडीतर्फे ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी करून आणि एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला.

मराठवाडा पदवीधर मतदार संघासाठी दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान झाले. या निवडणुकीत एकूण ६२.५३ टक्के मतदानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मतमोजणीनंतर डॉ. प्रतापसिंह पाटील यांना ८५ हजार ८७६ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांना ६७ हजार ७५२ मते मिळाली. त्यामुळे डॉ. पाटील यांनी १८ हजार १२४ मतांच्या मताधिक्याने विजय संपादन केला.

या विजयाच्या पार्श्वभूमीवर भोकरमध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. या कार्यक्रमास काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गोविंद बाबा गौड पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. शिवाजी कदम नागापूरकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ वर्षेवार, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे विधानसभा अध्यक्ष सुभाष पाटील कोळगावकर, ज्येष्ठ पत्रकार एल. ए. हिरे, माधव शिंदे, जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील चिट्टे, बंडू पाटील गाडेगावकर, आदिनाथ चिंताकुटे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोटासाठी शिक्षणाच्या वयातच करावी लागतेय दोरीवरची कसरत!

हातात पाटी-पेन्सील असण्याच्या वयात जीव धोक्यात घालून कुटुंबाचा उदरनिर्वाह; स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही गरिबीचे विदारक वास्तव

शंकरनगर (प्रतिनिधी) –ज्या वयात मुलांच्या हातात पाटी-पेन्सील असायला हवी, त्या वयात पोटाची खळगी भरण्यासाठी दोरीवरची कसरत करण्याची वेळ लहान मुलांवर येत आहे. शिक्षण घेण्याच्या आणि खेळण्या-बागडण्याच्या वयात जीव धोक्यात घालून रस्त्यावर कसरतीचे खेळ सादर करणाऱ्या एका परराज्यातील कुटुंबाचे चित्र शंकरनगर येथे पाहायला मिळत आहे. दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आणि उदरनिर्वाहाची चिंता यामुळे या कुटुंबाला गाव सोडून परराज्यात भटकंती करावी लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार हे कुटुंब छत्तीसगड राज्यातील शक्ती तालुक्यातील लिबतरा येथील असल्याचे सांगितले जाते. कुटुंबातील सदस्य महेश गबरनट नड आणि दुगेश्वरी शंकर नड महेश यांचा तीन वर्षांचा मुलगा अशी नावे उपलब्ध माहितीत नमूद आहे.

उदरनिर्वाहासाठी हे कुटुंब गावोगावी फिरत असून, ज्या ठिकाणी कसरतीचे खेळ सादर करण्याची संधी मिळते, तेथे खेळ दाखवून मिळणाऱ्या पैशांतून उदरनिर्वाह केला जातो. खेळ संपल्यानंतर रात्री मुक्कामासाठी जागा शोधावी लागते. कायमस्वरूपी निवारा नसल्याने एका ठिकाणचा खेळ संपला की पुढील ठिकाणी जाणे, असे अस्थिर जीवन या कुटुंबाच्या वाट्याला आले आहे.

लहान बालकांसह भटकंती; सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

या कुटुंबात एकूण पाचजण असल्याची माहिती मिळाली आहे. कुटुंबासोबत दोन महिन्यांचे बाळ आणि तीन वर्षांचे लहान मूल असल्याचे सांगण्यात आले. एवढ्या लहान बालकांना सोबत घेऊन गावोगावी भटकंती करताना त्यांच्या आरोग्याची, पोषणाची आणि सुरक्षिततेची काळजी घेणे हे मोठे आव्हान ठरू शकते.

दोरीवर कसरती करताना तोल जाणे किंवा अपघात होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत लहान मुलांना कसरती कराव्या लागत असतील, तर त्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. मात्र, या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि मुलांकडून नेमक्या कोणत्या प्रकारच्या कसरती करून घेतल्या जातात, याची प्रत्यक्ष पडताळणी होणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही गरिबीचे वास्तव

देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास आठ दशके झाली. शिक्षणाचा प्रसार, रोजगाराच्या संधी आणि सर्वांगीण विकासासाठी विविध प्रयत्न होत असतानाही काही कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी गावोगावी भटकंती करावी लागते, ही चिंतेची बाब आहे.

बालपण हे शिक्षण, खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे असते. मात्र, आर्थिक विवंचनेमुळे मुलांना शिक्षणापासून दूर राहावे लागत असेल आणि उपजीविकेसाठी धोकादायक कसरती कराव्या लागत असतील, तर त्यांच्या भवितव्याचे काय असा प्रश्न उपस्थित होतो.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308

सर्वसामान्यांच्या आरोग्याची चिंता मिटणार

वाडी (बु.) उपजिल्हा रुग्णालयातून मिळणार अत्याधुनिक सुविधा

- आ. बालाजीराव कल्याणकर यांचे परिश्रम फळाला
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज लोकार्पण

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. त्यांच्या विशेष प्रयत्नांतून वाडी बुद्रुक येथे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले असून, रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या रुग्णालयाचे लोकार्पण होणार आहे. या रुग्णालयामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना किरकोळ आजारांपासून गंभीर आजारांपर्यंतच्या उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयांमध्ये धाव घ्यावी लागत होती. अनेकदा आर्थिक अडचणी आणि वेळेअभावी उपचारांनाही विलंब होत होता. ही गरज लक्षात घेऊन आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी वाडी बुद्रुक येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता या परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे नवे केंद्र उपलब्ध होत आहे.

या रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागांतर्गत असंसर्गजन्य रोग तपासणी व उपचार, वैद्यकीय सेवा, बालरोग, स्त्रीरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, दंतरोग, शल्यचिकित्सा आणि भौतिक उपचार असे विविध विभाग सुरू करण्यात आले आहेत. वयाची ३० वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांची मधुमेह, उच्च रक्तदाब, पक्षाघात, हृदयरोग तसेच कर्करोगासंदर्भातील तपासणी व उपचार केले जाणार आहेत. गर्भवती महिला, लहान मुले आणि किशोरवयीन मुला–मुलींसाठीही स्वतंत्र आरोग्यसेवा उपलब्ध आहे. आंतररुग्ण विभागात विविध आजारांच्या रुग्णांना दाखल करून उपचार केले जाणार आहेत. स्तनदा माता आणि आजारी बालकांसाठीही विशेष सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय प्रयोगशाळेत रक्त, लघवी आणि थुंकीच्या नमुन्यांची तपासणी केली जाणार आहे. गर्भवती महिलांसाठी सोनोग्राफी, नवजात बालकांसाठी स्वतंत्र कक्ष, विविध शारीरिक भागांचे एक्स–रे आणि ईसीजी तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शस्त्रक्रिया विभागात हर्निया, हायड्रोसील, अपेंडिक्स यांसारख्या शस्त्रक्रिया तसेच आवश्यकतेनुसार सिझेरियन प्रसूतीची सुविधा उपलब्ध राहणार आहे. लवकरच मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि डायलिसिसची सुविधाही सुरू करण्याचे नियोजन आहे. अपघात विभाग २४ तास सुरू ठेवण्यात येणार असून, आपत्कालीन रुग्णांना तातडीने उपचार मिळणार आहेत. तसेच प्रसूती विभागात २४ तास प्रसूती सेवा उपलब्ध राहणार आहे.

आरोग्यसेवेचे नवे केंद्र

आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे वाडी बुद्रुक येथे साकारलेले हे उपजिल्हा रुग्णालय नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या आरोग्य सुविधांमध्ये महत्त्वाची भर घालणारे ठरणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना महागड्या खासगी रुग्णालयांवर अवलंबून न राहता शासकीय यंत्रणेमार्फत विविध तपासण्या आणि उपचार घेता येणार आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे रुग्णालय आरोग्याचा मोठा आधार ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणाऱ्या लोकार्पण होत असलेल्या या आरोग्य सुविधेचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या पाठपुराव्यातून साकारलेले हे रुग्णालय नांदेड उत्तरच्या आरोग्य सुविधांच्या विस्तारातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

रेती तस्करांवर पोलिसांची कारवाई; ५ ब्राससह हायवा जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान मुदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना रेती वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर पोलिसांनी कारवाई करून एकूण ४० लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रभारी अधिकारी, मुदखेड यांना गोपनीय माहिती मिळाली की, वासरी रोडवर वाहनांमधून अवैधरित्या रेतीची वाहतूक सुरू आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन हायवा क्र. MH-26 CH-2418 थांबवून पाहणी केली असता, वाहनामध्ये अंदाजे ५ ब्रास रेती असल्याचे आढळून आले. संबंधितांकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक परवाना व कागदपत्रांबाबत चौकशी केली असता, सदर वाहतूक अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी पंचनामा करून हायवा (अंदाजे किंमत ४० लाख रुपये) व त्यामध्ये असलेली ५ ब्रास रेती (किंमत २५ हजार रुपये) असा एकूण ४० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मनपाच्या वतीने वल्लभभाई पटेल व स्व. इंदिरा गांधी यांना अभिवादन

नांदेड (प्रतिनिधी)– भारताचे शिल्पकार, लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्यावतीने शनिवार, दि. ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी ८.३० वाजता जुना मोंढा टॉवर येथील त्यांच्या पुतळ्यास महापौर सौ. कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पालिकेच्या मुख्य प्रशासकीय ईमारतीत सकाळी ९ वाजता त्यांच्या प्रतिमेस महापौरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी सामूहिक 'राष्ट्रीय एकता शपथ' घेतली.

नांदासौख्यभरे

चौधरी – शेख

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील रहिवासी पै. यासीनसाब महंमदसाब चौधरी यांचे चिरंजीव गरीब नवाज यांचा शुभविवाह मुदखेड तालुक्यातील बारड येथील रहिवासी जनाब अमीन अजीज शेख यांची सुकन्या अलमास हिजसमवेत रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.१५ वा. शीतलादेवी मंगल कार्यालय बारड ता. मुदखेड येथे संपन्न होत आहे.

वधु–वरास हार्दिक शुभेच्छा!

–संपादक



Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com